# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ३६५/२०२१**

**तक्रारकर्ता श्री. सुरेश वासुदेव पाटील**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. महाव्यवस्थापक**
(मासं-३), महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित, एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
धारावी रोड, माटूंगा, मुंबई -४०० ०१९

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप महाव्यवस्थापक**
(मासं-३), महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित, एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
धारावी रोड, माटूंगा, मुंबई -४०० ०१९

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २५.०६.२०२६</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.०८.२०१९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अर्जदार यांच्या मुळ अर्जातील मुद्दा क्र. २ मध्ये नमुद असलेली माहिती/ कागदपत्रे अर्जदारास विनामुल्य उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केले होते. प्रथम अपिलीय अधिंकारी यांचे आदेशाप्रमाणे माहिती मिळालेली नाही म्हणून तक्रारकर्ता यांनी आयोगाकडे दि. ०६.१०.२०२१ रोजी तक्रार दाखल केली. तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाच्या कार्यालयाने दि. ०१.०६.२०२२ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा सहा. महाव्यवस्थापक (मासं- ३), महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित, माटूंगा, मुंबई यांच्याकडून अहवाल मागितला. जन माहिती अधिकारी तथा सहा. महाव्यवस्थापक (मासं- ३), महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित, माटूंगा, मुंबई यांच्याकडून आयोगास दि.२४.०६.२०२२ रोजी अहवाल प्राप्त झालेला आहे.

२. सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे संयुक्त स्वाक्षरीचे लेखी निवेदन दि. २५.०६.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, तक्रारकर्ता यांचे माहिती अर्जातील मुद्दा क्र. २ मध्ये नमुद केले होते की, दि. ०२.०५.२०१९, दि. ०८.०५.२०१९ व दि.१६.०५.२०१९ अन्वये सक्षम अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची कागदपत्रे पुरविण्यात यावी त्याप्रमाणे तक्रारकर्ता यांच्या मूळ माहिती अर्जात नमूद निवेदन दि. ०२.०५.२०१९ चा उल्लेख त्यांच्या निवेदन दि. ३०.०५.२०१९ रोजीच्या अर्जात आणि तदनंतर सादर इतर अर्जांच्या अनुषंगाने मा. सक्षम अधिकारी यांना टिप्पणी सादर करण्यात आली होती. उपरोक्त टिपणीस प्राप्त मान्यतानुसार तक्रारकर्ता श्री.

..२/-

सुरेश पाटील यांना महानिर्मिती पत्र क्र. १४५२, दि. १४.०२.२०२२ अन्वये उत्तर देण्यात आले आहे. याशिवाय त्यांनी सादर केलेल्या समविषयी प्रकरणी देखील त्यांना महानिर्मिती कंपनी पत्र क्र. ९८४६, दि.२०.०९.२०२३, क्र. १२१०४, दि. ०८.१२.२०२३ अन्वये उत्तर देण्यात आले आहे.

३. जन माहिती अधिकारी यांनी असेही सादर केले की, तक्रारकर्ता यांचे विरुध्द नियमाप्रमाणे शिस्तभंग विषयक कार्यवाही करुन दि. ०३.०७.२००७ रोजी महानिर्मितीच्या कंपनीतून बडतर्फ करण्यात आले आहे तेव्हा पासून ते या मुद्यांवर वारंवार माहिती अर्ज सादर करतात व त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

४. या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : २९.०६.२०२६**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**